रे.मु.नं. ६८४/२०१४ मधील नि.१९ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ने त्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

२ प्रतिवादीच्या मते, त्यास रजिष्टर पोस्टाने दि.१८.९.१५ रोजी समन्स बजावणी झाली व दि.१.१०.१५ रोजी त्यास न्यायालयाचे समन्स मिळाले. परंतू तो वयोवृध्द असल्यामूळे व त्याच्या अज्ञानामूळे रजिष्टर पोस्टाने मिळालेल्या समन्सची समज वकीलांना देण्याचे राहून गेले. त्यामूळे त्यास विहीत वेळेत कैफियत देता आली नाही. परंतू न्यायालयाचे समन्स मिळाल्यापासून सदरची कैफियत वेळेत दाखल केली आहे. त्यामूळे कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून त्याची कैफियत स्वीकारण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

३ वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून त्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्याच्या मते, अर्जातील कारण हे खरे नाही. वादीस मुंबइहून यावे लागते. त्यामुळे अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती त्याने केली आहे.

४ प्रतिवादीच्या विद्‌वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे विद्‌वान वकील यूक्तीवाद करण्यास असमर्थ ठरले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादीस रजिष्टर पोस्टाचे समन्स मिळाल्यापासून कैफियत दाखल करण्यास १२ दिवसांचा अल्पसा विलंब झालेला आहे. प्रतिवादीने न्यायालयाचे समन्स मिळाल्यापासून विहीत वेळेत कैफियत दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरण गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रतिवादीस त्याची कैफियत मांडण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. त्यामुळे न्यायाचा हेतु साध्य करण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. प्रतिवादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

दि.२३.०३.२०१८ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश,क स्तर,बार्शी

<u>Certificate</u>

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Lasane. |
| Court | : | 3rd JtCJJD & JMFC, Barshi. |
| Date: | : | 23/3/2018 |
| Judgment/Order signed by the presiding officer | : : | 23/3/2018 |
| Judgment/Order uploaded on | : : | 26/3/2018 |